दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# अखेर महाविकास आघाडीचं ठरलं;जागा वाटपाचा तिढा सुटला

## १००-८०-८० फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब




**मुंबई (वृत्तसंस्था)**
विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपासाठी बैठकांवर बैठका सुरू आहेत. महायुतीचा जागा वाटपाचा फार्म्युला जवळपास फायनल झाला आहे. पण महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाबाबतची चर्चा गुरूवारपर्यंत सुरूच होती.
अखेर त्यांचा देखील जागा वाटपाचा फार्म्युला ठरला आहे. महाविकास आघाडीमध्ये १००-८०-८० फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, महाविकास आघाडीच्या बैठकीमध्ये जागा वाटपाचा फायनल फॉर्म्युला ठरला आहे. आतापर्यंत २८८ जागांपैकी २६० जागांचे वाटप पूर्ण झाले आहे. यामधील १०० जागा काँग्रेस पक्षाला तर उद्धव ठाकरे गटाला ८० आणि शरद पवार गटाला ८० जागा देण्यावर आघाडीतील नेत्यांनी शिक्कामोर्तब केला आहे.
महाविकास आघाडीने उर्वरीत २८ जागा या मित्र पक्षांना सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या २८ जागांवर दोन पक्षांनी दावा केला आहे. हा २८ जागांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. या जागांवर सध्या महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरू आहे. येत्या दोन दिवसांत हा तिढा देखील सुटेल आणि जागा वाटपाचा निर्णय जाहीर करण्यात येईल अशी माहिती समोर आली आहे. येत्या रविवारी महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा निर्णय जाहीर केला जाईल.
दरम्यान, महाविकास आघाडीमध्ये रामटेक, दक्षिण नागपूरच्या जागेवरून वाद कायम आहे. मविआच्या बैठकीत उद्धव ठाकरे गट, काँग्रेस दोन्ही पक्ष रामटेक, दक्षिण नागपूरसाठी आग्रही असल्याने दोन्ही जागांची चर्चा थांबली आहे. आज पुन्हा या दोन्ही जागांवर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. कामठी काँग्रेसला तर हिंगणा राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोडण्यास सहमती झाली आहे. रामटेक, दक्षिण नागपूर ऐवजी राज्यात दुसरीकडे जागा, उबाठाला वाढवून देण्याचा पर्याय काँग्रेसकडून दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे महायुतीत आशिष जयस्वालला उमेदवारी दिल्यानं माजी आमदार रेड्डी यांनी वेगळी चूल मांडण्याचा तयारीत असल्याने यात महाविकास आघाडीत दोन्ही पक्ष डोळा ठेवून बसले आहेत.

# समाजभूषण पुरस्कार प्रदान


## गुणवंत विद्यार्थ्यांना धनादेशांचे वाटप



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**
येथील योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार वितरण तसेच शुक्ल यजुर्वेदीय माध्यदिन महाराष्ट्रीय ब्राम्हण मध्यवर्ती मंडळ यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप असा संयुक्त कार्यक्रम नुकताच उत्साहात संपन्न झाला.यावेळी व्यासपीठावर जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,मुख्याध्यापिका स्वरूपा कुलकर्णी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर ,मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर सेलमुकर,बाबुराव बाभुळगाव कर, आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.
यावेळी बोलताना मुंदडा म्हणाले की,
सामाजिक कार्यात जवाबदारीने सहभाग घेऊन ते कार्य यशस्वी करणाऱ्यांचा समाजभुषण पुरस्कार देऊन गौरव करावा ही बाब लक्षात घेऊन योगेश्वरी वधु - वर सुचक मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील व्यक्तिंना शोधून पुरस्कार देऊन गौरविले ही बाब प्रेरणादायी आहे
या गुणवंतांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा असेही ते म्हणाले
मुख्याध्यापिका स्वरूपा कुलकर्णी म्हणाल्या की,प्रत्येकांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले त्याची दखल घेऊन मंडळाने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविले ही बाब अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येकाने समाजात उदभवणाऱ्या समस्यांवर विचार करून त्या सोडविल्या तर कमी होतील व त्यावर उपाय निघेल
प्रारंभी मंडळाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत राहूल देशपांडे,राजश्री पिंपळे,स्मिता भातलवंडे यांनी केले. प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले
संचालन प्रशांत बर्दापुरकर यांनी तर उपस्थितांचे आभार बाबुराव बाभुळगांवकर यांनी मानले.या कार्यक्रमास महिला, नागरीक उपस्थित होते
समाजभूषण पुरस्कार
योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा.शशीकांत पसारकर सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिक्षा जोशी,वधु-वर मंडळातील योगदाना बद्दल अशोक टाकळकर यांना तर वैद्यकीय क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल डॉ.गौरी कुलकर्णी यांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांना डी. वाय.एस.पी.विश्वंभर गोल्डे यांचे गैरवर्तन

## बीड चे पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली या गैरवर्तन प्रकाराची तक्रार



**बीड | प्रतिनिधी**
उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक १६/१०/२०२४ रोजी विनाकारण त्रास दिला आहे.पोलीस मुख्यालय येथे ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान दिनांक ०९/०४/२०२४ माहिती अधिकार अर्जावर काय कारवाई झाली का?विचारणा करिता गेलो होतो.
पूर्व वैमन्यस माझ्या बद्दल सदरील कार्यालयाचे कर्मचारी, अधिकारी यांच्यात दिसून आले, या कार्यालयात बॅन करण्याचा प्रकार दिसून आला.उल्लेखित तारखेला जेव्हा माजी सैनिक प्रकाश वाघमारे तेथे पोहोचलो व विचारपूस करू लागलो, चुकीची माहिती देवून पडताळीत करता हे योग्य नाही असे म्हणालो,माहित न होता निर्णय घेता हजर असल्यास सुनावणी पुढे ढकलतो माहिती आपल्या संबंधीत असतानी राज्य आयोगाकडे वर्ग करता हा कर्तव्य कसूर अधिकारांचा गैरवापर आहे. तेथील कर्मचाऱ्यांना म्हणालो त्याच क्षणी या कार्यालयाची माहिला कर्मचारी शिंदे व इतर तीन कर्मचारी उपविभागीय अधिकारांना विचारतो म्हणून उपविभागीय अधिकारी विश्वंबर गोल्डे यांच्या कॅबीन मध्ये गेले व बंद दरवाजात चर्चा करून वाद घालण्याचा प्लॅन केला, वाईट शब्द प्रयोग करा म्हणजे संबंधित व्यक्ती मोठ्याने बोलल्या मुळे त्याच्यावर कलम ३५३ गुन्हा दाखल करू आणि कॅबीन मधून बाहेर आल्यावर तसा प्रकार ही झाला, माझ्याशी हुज्जत घातली, वाद विवाद केला.उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस गाडी मागवून तेथील कर्मचाऱ्यांना आदेश दिले धक्के मारून याला गाडीत नेवून बसवा पोलीस मुख्यालय गेट पासून शहर पोलीस स्टेशन बीडला घेवून गेले व सकाळी ११ ते रात्री १० वा. पर्यंत बसवून ठेवले. तेथील कर्मचारी ही आरोपी प्रमाणे माझी हजेरी घेत होते. हा विनाकारण त्रास देण्यात आला, असैवंधानिक भाषेचा वापर केला. अपमानीत केले, आपण या विभागाचे प्रमुख असल्याचने यांच्या गैरवर्तनावर कारवाई करण्याचे आपले कर्तव्य आहे, आपणास विनंती उचीत कारवाई करावी,अशी माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी निवेदनाद्वारे एस.पी.कडे मागणी केली आहे.

## नशेडी युवकाचा सोसायटीमध्ये धिंगाणा

# पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करा; ११२ चा अजब सल्ला




**छ.संभाजीनगर | प्रा संजय तुपे**
वाळूज महानगर, दुपारी तीन वाजेच्या सुमारास एक युवक स्टीक फास्टचा नशा करत वडगाव को.येथील साईबन सोसायटीच्या मुख्य रस्त्यावर येऊन धिंगाणा घालत होता. कुणी समजावायला गेलं तर अंगावर मारायला धावून येत होता. हा सर्व प्रकार जवळपास २५ मिनिटे सुरु होता. युवक नशेच्या धुंदीत असल्याने आणि नुकतेच शहरात नशेच्या धुंदीत खूनाची घटना ताजी असल्याने त्या युवकास हात लावण्याची कुणाचीही हिंमत झाली नाही.
काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास एक तरुण वडगाव को येथील साईबन हौसिंग सोसायटीच्या मुख्य रस्त्यावर फुल्ल नशेमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या माहिलां व पुरुषांनी दमदाटी व शिवीगाळ करून दहशत निर्माण करीत होता. दरम्यान एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक मनोज शिंदे यांना
९९२२०२७९८६ वर संपर्क साधला असता त्यांनी ११२ वर कॉल करण्याचा सल्ला दिला. ३:११ वाजता ११२ला कॉल केला असता कर्मचारी ३.३१ ला दाखल झाले.
इतक्या वेळात सदर युवकाने सोसायटीच्या मुख्य रस्त्यावर धिंगाणा घालत गाडीच्या काचावर हाताने मारत होता सतत खिशातून स्टीक फास्ट कपड्यावर टाकून नशा करत होता, येणाऱ्या जाणाऱ्यांना शिवीगाळ करत होता. ५ मिनिटांत त्याने २ बाटल्या कपड्यावर ओतून नशा करत होता. रिकाम्या बाटल्या रोडवर फेकत होता. जवळपास २० मिनिट तो युवक धिंगाणा घालत होता .
आम्हाला पण जीव आहे
११२ वरील कर्मचारी ३. ३१ ला दाखल झाले तेव्हा सदर युवक पाण्याने तुडूंब भरलेल्या तलावाच्या कडेला असलेल्या झुडपात जाऊन बसला होता. त्याला ताब्यात घ्या असे सांगितले असता .. आम्हाला पण जीव आहे. जाऊ द्या त्याला तिकडे, आता तो इकडे येणार नाही असे म्हणत 'आमचा पूर्ण स्टाफ करोडी फाट्यावर आहे, मी जोगेश्वरीहून आलो असे म्हणत तुम्ही पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करा, असा सल्ला देत सदर कर्मचाऱ्यांनी मोबाईल काढून सदर नशेडी युवक तळ्याच्या दिशेने गेला आहे, कॉल करणारे माझ्या समोर आहे , असे वरिष्ठंना कळवत सांगून निघून गेले.

## विधानसभा निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

# घनसावंगी विधानसभा मतदार संघात 3 लाख २४ हजार ७८3 मतदार

**घनसावंगी | असलम कुरेशी**
घनसावंगी विधानसभा मतदारसंघात ३ लाख २४ हजार ७८३ मतदार असून, त्यात पुरूष १ लाख ६८ हजार ६९७, महिला १ लाख ५५ हजार ९५२, सैनिक मतदार १३४ आहेत. यासाठी एकूण ३५४ मतदान केंद्र आहेत. ३५४ व राखीव ३६ असे एकूण ३८९ पथके स्थापन केली असून, यात अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार योगिता खटावकर यांनी दिली.
घनसावंगी विधानसभा मतदारसंघात ३५४ मतदान केंद्र असून, त्यापैकी घनसावंगी तालुक्यात १९४, अंबड तालुक्यात १०१ व जालना तालुक्यात ५९ मतदान केंद्र आहेत. सर्व मतदान केंद्रांची क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. मतदासंघात पुरुष मतदार १,६८,६९७, महिला मतदार १,५५,९५२, सैनिक मतदार १३३ असे एकुण ३ लाख २४ हजार ७८३ मतदार आहेत. मतदार याद्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून सर्व ३५४ मतदान केंद्रांसाठी चिन्हांकित मतदार याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. घनसावंगी विधानसभा निवडणुकीसाठी ३७९ पथके तयार करण्यात आलेली आहेत. मतदान केंद्रनिहाय पथकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. आवश्यक सर्व साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाले असून, मतदान केंद्रांवर पाठविण्यासाठी आवश्यक सर्व साहित्य मतदान केंद्रनिहाय लावण्यात आले आहे. ३५ क्षेत्रासाठी एकूण ३५ टेबलवर तालुका क्रीडा संकुल, राजेगाव रोड, घनसावंगी येथून साहित्य वाटप करण्यात येणार आहे.
मतदानासाठी हा पुरावा लागणार मतदान करतांना मतदान ओळखपत्राशिवाय, पासपोर्ट, वाहन चालक परवाना, सरकारी नोकरीचे ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बैंक/पोस्ट ऑफीस यांनी दिलेल्या फोटोसह पासबुक, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड, मनरेगाचे जॉब कार्ड, खासदार, आमदार यांना दिलेले शासकीय ओळखपत्र, आधार कार्ड आदी ओळखपत्रे मतदार पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील.
१८ टेबलवर होणार मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर सकाळी ८ वाजेपासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राजेगाव रोड, घनसावंगी येथे एकूण १४ टेबलवर, तसेच पोस्टल ३ टेबल व ईटीपीबीएसच्या १ टेबलवर मतमोजणी प्रक्रिया निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत व निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार योगिता खटावकर, विजय चव्हाण, नायब तहसिलदार संतोष इथापे यांच्या नियंत्रणाखाली पार पाडण्यात येईल, अशी माहिती कळवण्यात आली आहे.

# दलीत तरुणास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण दोघा भावा विरुध्द ट्रोसिटीचा गुन्हा दाखल

**केज | गौतम बचुटे**
टोल नाक्यावर असलेल्या हॉटेलवर नाष्टा करण्यासाठी थांबलेल्या एका दलीत तरुणाला पाठीमागून आलेल्या तरुणाने आणि त्याच्या भावाने जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी दोघा भावा विरुद्ध ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या बाबतची माहिती अशी की, दि. १७ ऑक्टोबर रोजी कोरेगाव ता. केज येथील रवींद्र शिनगारे हा दलीत तरुण केजकडे जात असताना तो सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास रस्त्यातील उमरी फाटा टोल नाक्या जवळ असलेल्या एका हॉटेल मध्ये थांबला होता. त्यावेळी त्याच्या मागून आलेला अमोल तांदळे त्याला म्हणाला की, रवींद्रने महेश तांदळे याच्या कडून घेतलेले एक हजार रु. मागितले. तेव्हा रवींद्र त्याला म्हणाला की, तो महेशला पैसे देणार आहे. असे म्हणताच अमोल याला रवींद्र हा अनुसूचित जातीचा आहे; हे माहीत असताना सुद्धा त्याला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच त्याचा भाऊ अतुल तांदळे यास फोन करून बोलावून घेतले. त्या दोघा भावांनी रवींद्र शिनगारे याला मारहाण करून त्याचे शर्ट फाडले आणि रवींद्र याच्या मोटार सायकलवर दगड मारून तोडफोड केली.या प्रकरणी रवींद्र शिनगारे याच्या तक्रारी वरून अमोल तांदळे व त्याचा भाऊ अतुल तांदळे या दोघांच्या विरुध्द के ज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ५५२/२०२४ भा. न्या. सं. ११८ (१), ११५ (२), ३५२ यासह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ (ट्रोसिटी) चे कलम ३(१)(आर), ३(१)(एस) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याचा तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना हे करीत आहेत.

# अजिंठा बुद्ध विहार, हाउसिंग कॉलनी येथे वर्षावास समारोप निमित्त खीर वाटप कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जीर्ण झालेल्या प्रकृतीचा विचार न करता आम्हाला दिलेल्या बौद्ध धम्माच्या मार्गदर्शनासाठी आणि पुढील विकासासाठी बुद्ध आणि त्यांचा धम्म हा धम्म ग्रंथ लिहून ठेवला. त्याच धम्मग्रंथाला प्रमाण म्हणून अजिंठा बुद्ध विहार, हाउसिंग कॉलनी, धानोरा रोड, बीड येथे आषाढ पौर्णिमा पासून बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाला सुरुवात झाली.

अजिंठा बुद्ध विहार येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखिल भारतातील तमाम बौद्धांची धम्म कार्य करणारी एकमेव संस्था भारतीय बौद्ध महासभा आणि हाउसिंग कॉलनी येथील धम्म ज्योती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित केला जातो. बीड जिल्ह्यामध्ये हाउसिंग कॉलनी विभागात मोठ्या प्रमाणावर बुद्धाच्या धम्मा कार्य होत असते, यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन, अवंतिका ताई वासनिक, सरस्वती ताई जाधव, शोभाताई साळवी, मायादेवी पारवे ताई, निलावती ताई साळवे, सुस्मिता डोंगरे ताई, कांता ताई जाधव, संजीवनी ताई गडगे, जनाबाई कांबळे, प्रमिलाताई भोसले, वर्षाताई कांबळे, राजश्री ताई घोडके, भालेराव आजी, सुशीला ताई कांबळे, रत्नमाला ताई चांदमारे, कांताबाई कांडेकर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

भारतीय बौद्ध महासभेच्या महिला शाखेने गेल्या ४० वर्षापासून सदरील अजिंठा बुद्ध विहार येथे धम्मग्रंथ वाचनाची परंपरा अविरत कायम ठेवलेले आहे व गौतम बुद्धाच्या धम्माचा प्रचार आणि प्रसार तन-मन धनाने करत असतात.



धम्म ग्रंथ बुद्ध आणि त्यांचा धम्म वाचनाचा समारोप प्रसंगी खीर वाटप करून कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी धम्म ज्योती महिला मंडळ तर्फे मायादेवी पारवे ताई यांना शुभ्र पांढरी साडी भेट देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान महिला पदाधिकाऱ्यांनी केला.

यावेळी शहर अध्यक्ष एडवोकेट केतन गायकवाड यांनी बाबासाहेबांनी लिहिलेला धम्मग्रंथ आणि २२ प्रतिज्ञांचे महत्त्व समजून सांगितले. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित असलेले भारतीय बौद्ध महासभेचे संदेश जी डोळस यांनी सुद्धा बुद्धाचा धम्म आणि आधुनिक जग या विषयावर आपले मत मांडले. भारतीय बौद्ध महासभेचे शहराचे पदाधिकारी एडवोकेट तेजस वडमारे यांनी सुद्धा बुद्ध आणि त्यांचा धम्म याविषयी अभ्यासपूर्व मार्गदर्शन केले. उपस्थित तालुक्याचे खेमाडे सरांनी आपले मत मांडले.

महिला पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन तसेच माया देवी पारवे, शोभाताई साळवी, कांताबाई जाधव, सरस्वती ताई जाधव यांनी सुद्धा आपले अनुभव आणि समाजातील बौद्ध धर्माचे वाटचाल यावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी येणारे भविष्य काळामध्ये भारतीय बौद्ध महासभेकडून बुद्धाचा धम्म प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भविष्यातील तयारी विषयी सखोल चर्चा झाली. शेवटी सरनतयाने कार्यक्रम संपन्न

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मनुष्यबळाची पहिली सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

## मतदान केंद्राध्यक्ष,मतदान अधिकारी यांची नियुक्ती

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. याकरिता मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळाची निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे पहिली सरमिसळ (रॅण्डमायझेशन) प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत आज पार पडली. याद्वारे मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




यावेळी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी रविंद्र पडूळकर, नायब तहसीलदार श्रीमती वैष्णव यांची उपस्थिती होती.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी जालना जिल्ह्यात १ हजार ७५५ मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत मनुष्यबळाची पहिली सरमिसळ (रॅण्डमायझेशन) एकूण ९ हजार ८५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांची करण्यात आली. त्यानुसार आता संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे आदेश वितरीत करण्याची कार्यवाही होणार आहे

# मुंबई विद्यापीठ अथेलेटिक्स स्पर्धेत खोपोली महाविद्यालयाचे घवघवीत यश

## राजू मुंबईकर व स्नेहल पालकर यांनी विद्यार्थ्यांना भेटवस्तु देऊन केले अभिनंदन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन झोन -१ च्या ऍथलिटिक्स स्पर्धा १६ आणि १७ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई विद्यापीठ क्रीडांगण मुंबई मरीन लाइन्स येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत के. एम. सी. महाविद्यालयातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून यश संपन्न केले.



या स्पर्धेत साहिल विचारे, प्रणव सावंत, सुजल घरत, विकास थिकडे, तुषार मेठल, साहिल धायगुडे यांनी ४०० मीटर रिले स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. पूर्वा जाधव, मुस्कान खान, साक्षी गुप्ता, शर्वरी शेवाळे, साक्षी गुप्ता, पायल पटेल यांनी ४०० मीटर रिले स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले. साहिल विचारे, सुजल मेठल, प्रणव सावंत, मुस्कान खान, पूर्वा जाधव यांनी १०० मीटर मिश्र रिले स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले. वैयक्तिक स्पर्धेत गौरव गुरुमकर (उंचउडी - कांस्य पदक), पूर्वा जाधव (८०० मीटर धावणे - रौप्य पदक, ४०० मीटर धावणे - कांस्य पदक), ईशा देशमुख (१० किलोमिटर धावणे - रौप्यपदक), गार्गी मसुरकर (थाळीफेक - कांस्यपदक) असे यश मिळविले.

या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक डॉ.जयवंत माने, अक्षय कदम, यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयांसह सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच या विद्यार्थ्यांचे केअर ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक रायगडभूषण राजू मुंबईकर आणि अध्यक्ष स्नेहल पालकर यांनी भेटवस्तू देऊन विशेष अभिनंदन केले.

# श्रीक्षेत्र नागनाथ मानूर येथील नऊगणयात्रा उत्साहात संपन्न

**शिरुर कासार । प्रतिनीधी**

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेले श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथील हजारो वर्षाची परंपरा असलेली नागनाथ देवस्थान व नागेश संप्रदायाची प्राचीन अशी आश्विन शुद्ध त्रयोदशी ची गणयात्रा म्हणजेच नऊगणयात्रा. ही गणयात्रा वार मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ व बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ या दोन दिवसांमध्ये अतिशय भक्तीपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाली.

मानूर नागनाथ देवस्थान हे नागेश सांप्रदायाचे मूळ असल्याकारणाने या गण यात्रेस अनन्यसाधारण महत्त्व आहे, म्हणून या गणयात्रेसाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून शिष्य सदभक्त या यात्रेसाठी आले होते. त्याचबरोबर श्री क्षेत्र कपिलाधार बीड ते श्रीक्षेत्र मानूर ही पदयात्रा आली होती तसेच ही पदयात्रा गेल्या ३० वर्षापासून येत आहे. पद यात्रेमध्ये अबाल वृद्धांसोबत अनेक नवतरुण या पदयात्रेमध्ये सहभागी झाले होते. त्याचबरोबर श्री दत्त मंदिर करंजी (ता.आष्टी) ते श्रीक्षेत्र मानूर नागनाथ ही पदयात्रा ही गेल्या दोन वर्षापासून मानूर येथे येत आहे याही पदयात्रा मध्ये असंख्य लहान थोर मंडळींसोबत स्त्रिया सुद्धा भजन व देवाचं नामस्मरण करत मानूर येथे आले होते यांच्या स्वागतासाठी श्रीक्षेत्र नागनाथ देवस्थानचे मठाधिपती श्री गुरु मानूरकर महाराज व मानूर ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मानूर येथील बसस्टँड वर आणण्यासाठी गेले होते. अतिशय जल्लोषपूर्ण वातावरणामध्ये दोन्ही पदयात्रा मानूर या ठिकाणी आल्या त्यानंतर मुख्य नऊ गण यात्रा उत्सवात सुरुवात झाली. प्रथमतः नऊ स्वामींचे खौर करण्यात आले. त्यानंतर मठाधिपती यांचे मंदिरामध्ये आगमन झाले आणि मुख्य गणयात्रेस प्रारंभ झाला. या गणयात्रेच्या माध्यमातून एक मुकपट करण्यात आला. ज्यामध्ये हे नऊगण खेळ खेळतात आणि यामध्ये राजा, प्रधान,कामगार आणि शेतीच्या बाबतीमध्ये हा प्रसंग दाखवण्यात आला आणि यामध्ये चोर चोरी करतो त्याला पकडून राजा प्रधान शिक्षा देतात आणि त्याच्याकडून जे काही चोरले आहे ते प्राप्त करून घेतात हे झाल्यानंतर त्या ठिकाणी पूजा करण्यात आली आणि पूजा केल्यानंतर त्या खेळाचा प्रसाद म्हणून उपस्थित सर्व सदभक्त शिष्य व ग्रामस्थ यांना ज्वारीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर नियमाप्रमाणे मठाधिपती व नऊगण यांचे औक्षण करण्यात आले त्यानंतर या नऊ गणायात्रेमध्ये मुख्य आकर्षण असलेले वीरभद्र देवता यांच्या धूपाची पूजा होऊन धूप काढण्यात आले यावेळी मठसंस्थान ते गावातील काही ठिकाणापर्यंत हा धूप खेळवण्यात आला त्यानंतर परत मठसंस्थानमध्ये आलेले अनेक शिष्य, सदभक्त ,नवतरुण, महिला स्वामी मंडळीं समवेत अनेक व्यक्तीनी धूप खेळला. या धुपाची सांगता विरभद्र देवता यांची आरती करून झाली. वार बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी नऊगण यांच्या हस्ते सद्गुरु नागनाथ महाराज व सर्व दैवता यांना नैवेद्य दाखवण्यात आला आणि महाप्रसादाचे वाटप झाले त्यानंतर रात्री सात वाजता या नऊ गण यात्रेचे सांगता व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मठसंस्थांनमध्ये श्रीमद् वरदशंकर भगवान यांची महापूजा करून कथा महात्म्य सर्व भक्तांना सांगण्यात आले आणि प्रसाद वाटप करून या नऊगण यात्रेची सांगता झाली.



या कार्यक्रमामध्ये शिरूर कासार येथील नायब तहसीलदार मा श्री शिवनाथ खेडकर व पुरवठा निरीक्षक शिवदास गावडे , तसेच मानूर सज्जाचे तलाठी भगवान टाक त्यांच्या सहकाऱ्यांनी या यात्रेस भेट दिली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने शिष्य सदभक्त या प्राचीन व ऐतिहासिक नऊ गणयात्रेस उपस्थित होते.

# साथीच्या आजारात वाढ दवाखान्यात गर्दी



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई वातावरणातील बदलामुळे लहान मुलांची, वृद्धांची प्रकृती वरचेवर बिघडत असून त्यांना सर्दी, ताप, खोकला अशा प्रकारच्या आजारात वाढ होताना दिसत आहे. शहराच्या विविध भागातील लहान मुले, वृद्ध माणसे यांना विविध आजाराची लागण होत असून त्यांच्या रक्ताची चाचणी केली असता त्यांना व्हायरल फिवर आजार सांगितल्या जात आहे वृद्धा सह तरुण मुले लहान बालके यांचाही मोठ्या समावेश प्रमाणात समावेश आहे. अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात थंडीताप, पेशी कमी होणे व तत्सम आजाराचे रुग्ण वाढल्याचे दिसत आहेत सध्याची स्थिती लक्षात घेता अधून-मधून पडणारा पाऊस, वातावरणातील बदल, पावसामुळे येणारे दूषित पाणी, परिसरातील अस्वच्छता या सर्व बाबींचा परिणाम या आजारात आहेअसे जरी असले तरी सर्दी, ताप, खोकला, मलेरिया व श्वसन विकारासह इतर आजारांची चाचणी होत आहे सध्या या जीवघेण्या आजाराचे मोठ्या प्रमाणावर थैमान आहे. सर्वच वयोगटातील नागरिकांनाआजाराने घेरले आहे अनेकांना आजाराबाबत गंभीरता वाटत असल्याने ते तात्काळ उपचार घेत आहेत. विविध भागातील घाणीच्या साम्राज्यामुळे डेंग्यु व इतर आजाराच्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे विशेष म्हणजे शहराच्या जुन्या भागात रिपरिप पावसामुळे मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्यामुळे यातून अनेक प्रकारच्या डासांची निर्मिती होत असून त्यामुळेच साथीच्या आजारांची लागण वाढली आहे अनेक रुग्ण उपचारार्थ दाखल होत आहेत. शिवाय बसस्थानक, मंदिरे आणि गर्दीची ठिकाणे या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असते त्यामुळे तिथेही आजाराची लागण होत आहे

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे आठ विद्यार्थी कॅरम बोर्ड स्पर्धेत विभागीय स्पर्धेसाठी निवड

**परळी । प्रतिनिधी**

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे येथे जिल्हा स्तरीय कॅरम स्पर्धेचे पार पडल्या या स्पर्धेत दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे आठ विद्यार्थीची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल शाळेचे मार्गदर्शक मा श्री किरण गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार व विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ उषाताई किरण गित्ते, मुख्याध्यापक श्रीकांत पाटील सर यांनी अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल येथे जिल्हा स्तरीय कॅरम स्पर्धेसाठी ४७२ मुलं आणि मुलींनी सहभागी नोंदविला या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील बीड, अंबाजोगाई,केज, माजलगाव, आष्टी, गेवराई आदी शाळांनी सहभाग घेतला.




दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल चे विद्यार्थी मुलीमध्ये १) मुगधा दराडे ण -१७, २) रुतुजा केदार ण - १४, ३) श्रावणी मुंडे ण -१४

मुलांमध्ये १) सोहम डुबे ण -१७, २) सुदर्शन गित्ते ण -१७,३) हर्षवर्धन सोळंके ण -१४ ,४) सौरभ कुकडे ण -१४ ,५) वरद खाडे ण- १४, विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या कोच कु संघमित्रा हुमने मॅडम, संजय देशमुख सर, विजय मुंडे सर, कांबळे सर, चाटे सर, विलास आरगडे सर यांनी परिश्रम घेतले.

# आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ५२१ कोटी अडकले

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

सप्टेंबर महिन्यात परतीच्या पावसाने चांगलाच बरसल्याने जिल्ह्यातील ६३ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली होती. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने प्रशासनाकडून नुकसान भरपाईचे ५२१ कोटी देण्याच्या मागणीचे प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र अचानक विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता लागल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दिवाळीपूर्वी येणारे ५२१ कोटी रूपयाला ब्रेक लागले असल्याचे दिसून येत आहे बीड जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या परतीच्या पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कापूस, सोयाबीन पिकांचा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याचबरोबर जिल्ह्यातील ६३ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाल्याची नोंद प्रशासनाकडून करण्यात आली होती. यानुसार जिल्ह्यातील ३ लाख ८३ हजार हेक्टर वरील पिकांचा अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याची नोंद घेत कृषी आणि महसूल प्रशासनाच्या संयुक्तपणे नुकसान भरपाईसाठी ५२१ कोटी रूपयाचा निधी देण्यात यावा याची मागणी करण्यात आली होती. मात्र अचानक लागलेल्या आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीच्या अनुदानाला ब्रेक लागल्याचे दिसून येत आहे. जिल्हा कृषी विभाग व महसूल प्रशासनाच्या अधिकारी कर्मचाऱ्याकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जावून शेतकऱ्यांच्या नुकसानीचे ई- पीक पाहणी करत नुकसान भरपाईचा अहवाल तयार करण्यात आला होता. परंतु अचानकपणे लागलेल्या आगमी विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितामुळे शेतकऱ्यांच्या अनुदानाला ब्रेक लागले असल्याचे दिसून येत आहे

# माल तोच पॅकिंग मात्र वेगवेगळे अशी राजकीय पक्षांची परिस्थिती-राजू शेट्टी

## परिवर्तन महाशक्ती आघाडी साताऱ्यात ६ ठिकाणी लढणार

**सातारा (वृत्तसंस्था)**

स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार संघटना व कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांनी एकत्र येत परिवर्तन महाशक्ती आघाडी स्थापन केली असून राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या विरोधात विधानसभा निवडणुकीमध्ये रणशिंग फुंकले आहे. सर्वसामान्यांच्या विकासाचे प्रश्न घेऊन आणि शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव हे जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन सातारा जिल्ह्यात ही तिसरी आघाडी सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार उभे करणार आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी साताऱ्यात पत्रकार परिषदेत दिली आहे.पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, महाराष्ट्रातील २२५ घराणी आणि त्या घराण्यातील सदस्य आलटून-पालटून सातत्याने राज्याच्या सत्तेत येत राहतात. या महायुती आणि महाविकास आघाडी शासनामध्ये माल तोच पॅकिंग मात्र वेगवेगळे.. अशी परिस्थिती आहे. या दोन्ही आघाड्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे. सर्वसामान्य जनतेला सक्षम तिसरा पर्याय देण्याकरता चळवळीतले आम्ही नेते वामनराव चटप, शंकरराव धोंडगे, संभाजीराजे छत्रपती, प्रहार संघटनेचे बच्चू कडू आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना एकत्र आली असून त्यांच्या कोअर कमिटीची बैठक गुरुवारी पुणे येथे होत आहे. या बैठकीत महाराष्ट्रात ज्या ठिकाणी सक्षम आणि स्वच्छ चेहऱ्याचा उमेदवार मिळेल अशा जागा आपण तिसरी आघाडी म्हणून लढवणार असल्याचे सूतोवाच राजू शेट्टी यांनी केले.

सातारा जिल्ह्यामध्ये कराड दक्षिण, कराड उत्तर, सातारा, माण, कोरेगाव व वाई या सहा विधानसभा मतदारसंघात स्वाभिमानी शेतकरी संघटना व कोअर कमिटी चर्चा करून उमेदवार देणार आहे. हे उमेदवार सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन जनतेच्या समोर जाणार आहोत, असे सांगून महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्यांचे थडगे बांधून विकास करणार आहात का? असा स्पष्ट सवाल राजू शेट्टी यांनी केला.

महाविकास आघाडीने भूमी अधिग्रहण अथवा एफआरपी या संदर्भात चुकीचे निर्णय घेतले तसेच महायुतीसुद्धा 'लाडकी बहीण योजने'च्या माध्यमातून लाखो रुपयांची उधळपट्टी करत आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये जनतेशी काहीही घेणे- देणे नसलेले प्रतिनिधी आहेत. एकीकडे पैशाची लयलूट सुरू असताना दुसरीकडे ३३०० कोटी रुपये मुलांच्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित आहेत, त्यामुळे असले सरकार काय कामाचे? असा प्रश्नही राजू शेट्टी यांनी विचारला.परिवर्तन महाशक्ती आघाडी राज्यात शेती, उत्पादन, शिक्षण व्यवस्था तसेच राजकीय व्यवस्था यांच्या बदलामध्ये निश्चित क्रांती घडवेल, असे सक्षम चेहरे आम्ही निवडणुकीच्या मैदानात उतरवत आहोत. त्यामुळे जनता ही आम्हालाच निवडून देईल, असा विश्वासही राजू शेट्टी यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, २५ ऑक्टोबर रोजी २३ वी ऊस परिषद भरवली जाणार असून ऊस दराच्या संदर्भात या परिषदेत चर्चा होईल. गतवर्षी तुटलेल्या ऊसाला पहिली उचल दोनशे रुपये व यंदाच्या उसाला किती दर घ्यायचा? हे ठरवले जाणार आहे. सातारा जिल्ह्यातील कारखानदारीचे साखर उतारे चांगले असताना कारखाने ३५०० रुपये पेक्षा जास्त दर देऊ शकत नाही, हाच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा लढा आहे. कारखान्याने जास्तीत जास्त दर द्यावा आणि ते देणे शक्य आहे. असे ठामपणे राजू शेट्टी यांनी सांगितले.



## पाटोदा येथे भटक्या विमुक्तांचे जिल्हाध्यक्ष हनुमंत धनवटे यांच्या आयोजनात चिंतन शिबिर संपन्नम

**पाटोदा । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यापासून भटक्या विमुक्त समाज आजही विकासापासून वंचित असून या समाजाचा राज्यकर्त्यांनी केवळ वोटबँक म्हणून वापर केल्यामुळे समाज उपेक्षित राहिला व समाजाला वंचित ठेवले.भटक्या-विमुक्त जाती जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी संघटना कार्य करीत संघटनेला राजकारण नाही तर भटक्या-विमुक्तांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करायचे आहे.असे मार्गदर्शन चिंतन शिबिरात संगीताताई पवार यांनी केले.पाटोदा तालुका येथील शासकीय विश्रामगृहात दि.१४/१०/२०२४ सोमवार रोजी अखिल भारतीय भटके-विमुक्त जाती जमातीच्या हक्कासाठी जिल्हास्तरीय चिंतन शिबिर संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संगीताताई पवार अध्यक्ष भटक्या-जाती,विमुक्त जमाती संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर अनवले अध्यक्ष भा.वि.वि.संघटना महाराष्ट्र राज्य,व्यासपीठावर हनुमंत धनवटे जिल्हा अध्यक्ष भटक्या जाती-विमुक्त जमाती व बाबुराव फुलमाळी प्रदेश कार्याध्यक्ष,दगडू दादा गायकवाड,प्रा.नवनाथ जाधव,डॉ. केशवदास वैष्णव,रमेश धोत्रे, ड.विशाल मस्के तसेच अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रासप बीड,आसाराम महारनवर तालुका अध्यक्ष पाटोदा,प्रा.भागवत माने आदींची उपस्थिती होती.यावेळी डॉ.वैष्णव,ड.विशाल मस्के,दगडू गायकवाड,रमेश धोत्रे,बाबुराव फुलमाळी,सुनील अनवले यांनी जमलेल्या समाज बांधवांना भाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी वक्त्यांनी भाषणातून शिक्षण हा समाज सुधारण्याचा मुख्य पाया असून शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणाने कुटुंबाची व समाजाची प्रगती होते.शिक्षणाने संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते.शिक्षणाअभावी भटक्या- विमुक्त जाती-जमाती मागासलेल्या आहेत.त्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्रित येऊन संघटित व्हावे व आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून उच्च शिक्षण द्यावे व पारंपारिक व्यवसायात गुरफटून न राहता शिक्षणावर भर द्यावा.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजे छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श व शिकवण आचरणात आणण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला भटके-विमुक्त जाती जमाती समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाचे आयोजन हनुमंत धनवटे महाराज बीड जिल्हाध्यक्ष यांनी उत्कृष्ट केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ जाधव यांनी केले



## सविता आकुसकर यांचे उपोषण मागे

**केज । गौतम बचुटे**

आडस येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला संरक्षक भिंत बांधण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या सविता आकुसकर या मागील तीन दिवसापासून उपोषणाला बसल्या होत्या.

आडस तालुका केज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संरक्षक भिंत बांधण्यात यावी. या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या सविता आकुसकर या १५ ऑक्टोबर पासून आडस येथे आमरण उपोषणाला बसल्या होत्या. दरम्यान राज्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचार संहिता

सविता आकूसकर यांची मागणी रास्त असल्याने आचार संहिता संपल्या नंतर या संदर्भात कारवाई करण्याचे आश्वासन पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे अभियंता राजू हातागळे यांनी आश्वासन दिल्या नंतर त्यांनी उपोषण मागे घेतले



## बीड नंतर अंबाजोगाई येथून ही वाहकाच्या साहित्याची चोरी

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

काही दिवसांपूर्वी बीड बस स्थानकात असलेल्या चालक- वाहकांच्या रेस्ट हाऊस मध्ये झोपलेल्या वाहकाचे साहित्य चोरी गेल्याची घटना ताजी असतानाच आता अंबाजोगाई बस स्थानकात सुद्धा अशीच चोरीची घटना घडली. येथेही वाहकाचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेले. यामुळे वाहक रवींद्र हरिभाऊ चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याविषयी सविस्तर वृत्त असे की, १६ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार वाजे दरम्यान एसटी बस क्रमांक एम.एच. २० बी.एल. १०१९ ही बस, बस स्थानकात लावलेली असताना कर्तव्यावर असलेले रवींद्र हरिभाऊ चव्हाण यांचे बस मध्ये पंचिंग तिकिटांची पेटी व त्यासोबतच आधार कार्ड, वाहक लायसन्स, बँकेचे एटीएम कार्ड असलेली बॅग कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. ज्यात पंचिंग तिकिटाची एकूण किंमत ७७, १३० रुपये होती. त्यासोबतच आधार कार्ड कार्ड अशा वस्तूही त्याच पेटीत होत्या. ही पेटी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. पेटीची चोरी झाल्याचे लक्षात येताच वाहक रवींद्र हरिभाऊ चच्हाण यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे गाठून या प्रकरणाचाबत फिर्याद दिली असता अज्ञात चोराविरुद्ध कलम ४३८/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार आवले करीत आहे

## पीडितेवर दोघांनी मिळुन अत्याचार केल्या प्रकरणी जामीन मंजुर- ड. तेजेश नेहरकर

**बीड । प्रतिनिधी**

घटनेची हकीकत अशी की, दोघांनी मिळून पीडितेला संगणमताने पळवुन नेऊन अत्याचार केला तसेच कोंडून ठेवून बलात्कार केल्या प्रकरणी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गु.रं.न. २३९/२०२४ अन्वये कलम १४० (३), १२४ (४), ६४ (२) (च्) ३, (ड) ११५ ३५१ (२) भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार विविध कलमान्वयें



फिर्यादी पिडीतेच्या जबाबावरून दि. ११/०९/२०२४ रोजी दोन्ही आरोपी नामे आकाश वाघमारे, बजरंग वाघमारे, रा. हिवरापहाडी ता. जिल्हा बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व दोन्ही आरोपींना तात्काळ पुणे येथुन अटक करण्यात आली होती. तसेच सदरच्या गुन्हा करताना पिडीतेला पळवून नेण्यासाठी वापरण्यात आलेली गाडी सुध्दा पिंपळनेर पोलीसांनी जप्त केली आहे. आरोपीचा जामीन अर्ज ड. तेजेश सुभाष नेहरकर यांच्या वतीने जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आला होता. आरोपीच्या बाजूने करण्यात आलेला भारी भक्कम युक्तीवाद, व आरोपीच्या वतीने मांडलेली बचावाची बाजु न्यायालयाने विचारात घेऊन आरोपीला अटी व शर्तीवर जामीन मंजुर केला आहे. या प्रकरणाकडे सर्व पंचक्रोशीतील नागरीकांचे लक्ष वेधले होते. आरोपीच्या वतीने सुप्रसिध्द वकील ड. तेजेश सुभाष नेहरकर यांनी काम पाहीले.

## प्रदीप मुंडे यांच्या मागणीला यश

### महावितरण कार्यालयावर दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याच्या दणक्याने वाण धरणावरील डी.पी.उपलब्ध

### शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या डी.पी. महावितरण कार्यालयातून घेऊन जाव्यात

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

नागापूर येथे असलेल्या वाण धरणावरील डीपी गेल्या एक वर्षापासून पाणीसाठा आरक्षित करण्याच्या कारणामुळे महावितरण कार्यालयाच्या वतीने आणि तहसील प्रशासनाने काढून घेतल्या होत्या. मोटारीचे कनेक्शन तोडण्यात आले होते. मात्र यावर्षी पाऊस काळ समाधानकारक झाल्यामुळे वाण धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. या अनुषंगाने नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या उर्फ बबलू शेठ मुंडे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आणि चार दिवसाच्या आत मागणी मान्य न झाल्यास महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली महावितरण कार्यालयावर भव्य आंदोलनाचा इशाऱ्याचा दणका देताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि वाण धरणावरील डीपी आता उपलब्ध करून दिल्या आहेत. उपलब्ध झालेल्या डीपी गावकऱ्यांनी महावितरण कार्यालयातून घेऊन जाव्यात असे आवाहन नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या उर्फ बबलू शेठ मुंडे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांची गेल्या वर्षीपासून मागणी होती की वाण धरणावर मोटारीचे कनेक्शन पूर्वत करावे परंतु परळी शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने त्यांची मागणी अमान्य केली होती गेल्या आठ दिवसापूर्वी नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या मुंडे उर्फ बबलू शेठ यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आणि पाठपुरावा केला त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. मांडेखेल, माळहिवरा, गोपाळपूर, अस्वलंबा तडोळी नागपिंपरी या गावातील शेतकऱ्यांच्या मोटारी वाण धरणावर आहेत त्यामुळे त्यांना आता त्यांच्या पिकांना पाणी देता येईल त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी प्रदीप भैय्यांचे आभार व्यक्त केले आहेत.



## धनंजय मुंडेंच्या पत्नीच्या कारला अपघात

### ट्रॅव्हल्सने दिली जोराची धडक, राजश्री मुंडे यांना किरकोळ दुखापत,पण गाडीचे मोठे नुकसान

**पुणे (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते तथा बीड जिल्ह्याचे पालकंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नीच्या कारला भीषण अपघात झाला आहे. पुणे- सोलापूर महामार्गावर पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. सोरतापवाडी या ठिकाणी ट्रॅव्हल्सने राजश्री मुंडे यांच्या कारला धडक दिली. या अपघातात राजश्री मुंडे किरकोळ जखमी झाल्या आहे. त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे पुणे-सोलापूर महामार्गावर प्रवास करत होत्या. त्या बीडहून मुंबईकडे जात असताना त्यांची कार सोरतापवाडी या ठिकाणी आल्यानंतर एका खासगी ट्रॅव्हल्स बसने त्यांच्या कारला धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की, राजश्री मुंडेंच्या कारच्या समोरच्या भागाचे मोठे नुकसान झाले आहे. पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला. अपघातानंतर महामार्गावर काही वेळासाठी वाहतूक खोळंबली होती. प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही वाहनांची वेगाने धडक झाल्यामुळे हा भीषण अपघात झाला. या अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. दोन्ही वाहनांचा वेग जास्त असल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे.या अपघातात धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे या किरकोळ जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार झाले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस अपघातस्थळी दाखल झाले. पोलिसांसह आसपासच्या नागरिकांनी अपघातग्रस्तांना मदतकार्य केले.

## नागनाथ विद्यालयाच्या मुलींची राज्य स्पर्धेसाठी निवड,१९ वर्षे वयोगटातील विभागीय स्पर्धेत पुण्याच्या संघावर केली मात

**रामहिंगणी (वृत्तसंस्था)**-१९ वर्षीय शालेय विभागीय हॉलीबॉल स्पर्धेत मोहोळ येथील नागनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालतील मुलींच्या संघाने पुणे शहरातील मिलेनियम नॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पुणे या संघावर मात करत विजयी मिळवला. या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १९ वर्षीय शालेय विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा मोहोळ येथील नागनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन मोहोळचे पोलिस निरीक्षक सुरेशकुमार राऊत, मोहोळ तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे यांच्या हस्ते व प्राचार्य बशीर बागवान यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या स्पर्धेमध्ये पुणे , पिंपरी चिंचवड, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये मुलींच्या अंतिम सामन्यात पुणे शहरातील मिलेनियम नॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पुणे संघाचा नागनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज मोहोळच्या ग्रामीण भागातील संघाने २ विरुद्ध ०० असा दारुण पराभव करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. आजपर्यंत हॉलीबॉल स्पर्धेत पुणे शहराचे देशात वर्चस्व होते परंतु नागनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, मोहोळच्या ग्रामीण भागातील खेळाडूंनी हे वर्चस्व मोडीत काढत मोहोळचे नाव राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचवले आहे. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक आबाराव गावडे, समीर शेख, मोहोळ तालुका क्रीडा संयोजक प्रा. संभाजी चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. विजय संघाचे प्राचार्य बशीर बागवान,उपप्राचार्य प्रकाश शिंदे यांनी अभिनंदन केले.स्पर्धेतील सहभागी संघ पुणे, पिंपरी चिंचवड, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील संघांनी सहभाग घेतला होता.

# मुख्यमंत्री होण्यासाठी खूप उठा-बशा काढाव्या लागतात-जयंत पाटील

## 'एक फुल दोन हाफ' म्हणत महायुती सरकारवर निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसल्याचे सूचक विधान केले आहे. केवळ घोषणाबाजी केल्यामुळे कुणी मुख्यमंत्री होत नाही. त्यासाठी खूप उठा-बशा काढाव्या लागतात, असे त्यांनी यासंबंधी आपल्या कार्यकर्त्यांचे कान टोचत म्हटले आहे.

जयंत पाटील इस्लामपूर येथे आयोजित एका सभेत म्हणाले, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आता संघर्षासाठी तयार झाला आहे. आमचा पक्ष फुटला तेव्हा आम्हाला आमच्याकडे प्रचारासाठी कुणीही राहिले नसल्याचे हिणवले जात होते. पण शरद पवार या नावाचे वलयच वेगळे आहे. पुढे अनेक गोष्टी घडत गेल्या. राज्यात एकही जिल्हा किंवा तालुका नाही की जिथे शरद पवारांना मानणारा कार्यकर्ता नाही.सद्यस्थितीत आमच्या पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत. एका मतदारसंघातून तर तब्बल ३० इच्छुकांनी उमेदवारीची मागणी केली आहे. महाराष्ट्राची राज्यातील सरकार बदलण्याची मानसिकता आहे. कारण, सद्यस्थितीत राज्याच्या विकासाचा बोजवारा उडाला आहे. राज्याचा कणा असणाऱ्या कृषी क्षेत्रात महाराष्ट्र थेट सहाव्या क्रमांकावर फेकला गेला आहे. ८ लाख कोटींचे कर्ज झाले आहे.जयंत पाटील पुढे म्हणाले, महायुतीचे लोक सत्ता सोडतील तेव्हा ते महाराष्ट्राच्या डोक्यावर सुमारे ९ लाख कोटींचे कर्ज ठेवून जातील. कायदा सुव्यवस्थेची स्थितीही फार वाईट झाली आहे. आमदारच गोळीबार करत आहेत. त्यामुळे आता गुंडांची गरजच उरली नाही. या सरकारने पोलिसांचे खच्चीकरण केले आहे. माझा बॉस सागर बंगल्यावर बसल्याची वल्गना करत पोलिसांना धमकावले जात आहे. त्यामुळे सरकारमधील एक फुल आणि दोन हाफ काय करत आहेत? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.आपण सर्वांनी महाराष्ट्रातील राजकारणात मला इथपर्यंत आणले. गॉफादर मिळाला की प्रगती होते. माझा गॉडफादर (शरद पवार) माझ्या मागे बसला आहे. त्यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले. वागायचे कसे? बोलायचे कसे? शरद पवारांसारखा नेता उभ्या भारतात नाही. मी मुहूर्त पाहतो तेव्हा शरद पवारांना ते आवडत नाही. २४ ऑक्टोबरला मी अर्ज भरेन तेव्हा पाण सर्वजण इथे भेटू. त्यानंतर राज्यभर मला फिरावे लागणार आहे. याठिकाणी काही जणांना माझ्या नावाचा उल्लेख भावी मुख्यमंत्री म्हणून केला. हे त्यांचे प्रेम आहे. पण अशा घोषणा देऊन कुणी मुख्यमंत्री होत नाही. त्यासाठी खूप उठाबशा काढाव्या लागतात. ही शिवस्वराज्य यात्रेची शेवटची सभा आहे. तुतारी वाजवणारा माणूस हे आपले चिन्ह आहे. ते घरोघरी पोहोचवा. आपल्याला चिन्ह मिळाल्यानंतर शरद पवार रायगडावर आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी हे चिन्ह ठेवले. त्याचवेळी आम्ही शिवरायांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवण्याची शपथ घेतली होती, असेही जयंत पाटील यावेळी बोलताना म्हणाले.

जयंत पाटील यांनी यावेळी लाडकी बहीण व लाडका भाऊ या योजनांवरही निशाणा साधला. लाडकी बहीण व लाडका भाऊ या सगळ्या योजना महायुती सरकारचे पुतना मावशीचे प्रेम आहे. २० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत या योजना चालतील, असे ते म्हणाले.



## अजित पवार यांची साथ दिल्याने माझे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न:धनंजय मुंडे यांचा आरोप

**पुणे (वृत्तसंस्था)**-छोटे पवार अर्थात अजित पवारांची साथ दिल्यामुळे माझे वैयक्तिक व सामाजिक राजकारणाचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी केला आहे. ते पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते.




पुण्यात राहणाऱ्या परळीच्या विद्यार्थी आणि नागरिकांनी बालगंधर्व रंगमंदिरात एक स्नेह मेळावा आयोजित केला होता. त्यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, छोट्या पवारांसोबत राहिलो म्हणून माझ्या व्यक्तिगत आणि सामाजिक राजकारण अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. येणाऱ्या निवडणुकीत ते आणखी प्रयत्न करत राहतील. पण जनतेने माझ्या सोबत राहावे. मग बाकीच्या गोष्टी मी पाहून घेईल. मी काही कारणास्तव बाजूला गेलो, तर माझे अखखे राजकारण संपवले जात आहे. मी कधी कोणाची जात काढली नाही, पण माझ्यामुळे काहीजण आज जात काढत आहेत. मी कोणाला कधीच घाबरत नाही. कारण जनतेसाठीचे माझे काम प्रामाणिक आहे. ज्यांनी अस्तित्व संपवणे प्रयत्न केला त्यांना आम्ही निवडणुकीत त्यांची जागा दाखवून देऊ.या स्नेह मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष दीपक मानकर, समीर चांदेरे, महादेव डोईफोडे, अजय मुंडे, राजपाल लोमटे , विठ्ठल सानप उपस्थित होते. बीड आणि परळी येथील विद्यार्थ्यांसाठी पुण्यात हॉस्टेल निर्माण करण्यात यावे, विद्यार्थी मित्र योजनाद्वारे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे मदत करण्यात यावी, अशी मागणी यावेळी विद्यार्थ्यांनी केली. धनंजय मुंडे म्हणाले, मी १२ वी नंतर परळीमध्ये कृषी शिक्षण घ्यावे असे वडिलांना वाटत होते. तर स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांना वाटत होते मी डॉक्टर झाले पाहिजे. पण माझी इच्छा होती की, पुण्यात येऊन वकील व्हावे. माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी पुण्यात आलो. राज्यभरातील मित्र माझे याठिकाणी झाले. जीवनात कधी जातपात, धर्म, पंथ मला शिवले नाही. राजकारणात कधी कोणाशी टोकाचे वैर झाले नाही. मी किंवा माझ्या वडिलांनी गोपीनाथ मुंडे यांच्या सारखे राजकारणात येऊन मोठे व्हावे ही इच्छा ठेवली नाही. मुंडे साहेब यांच्यासाठी मी राजकारणात आलो. ते माझ्यासाठी मिशन आहे.प्रत्येकजण राजकरणात यशस्वी होईल ज्यावेळी राजकारण समाजसेवासाठी करेल. आमचे संघर्षाचे राजकारण आहे. जनतेचे जोपर्यंत प्रेम माझ्या सोबत आहे तोपर्यंत कोणी माझे घराचे, जातीचे काढले तरी काही होऊ शकत नाही. बीड जिल्ह्याला विचारत घेतल्याशिवाय राज्याचे राजकारण होऊ शकत नाही.

## राष्ट्रवादीच्या कोट्यात तीन जागा असत्या तर मी आमदार झाले असते-चाकणकर

**पुणे (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी नाराजी व्यक्त करत आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्या कार्यकर्ती २४ तास तुमच्यासोबत असतात म्हणून तुम्ही त्यांचीच बाजू घेणार का, असा सवाल अजित पवारांना करत रुपाली चाकणकरांवर टीका केली होती. यावर रूपाली चाकणकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मानकरांना शहराध्यक्ष पद देताना मी भगिनी म्हणून त्यांच्या पाठीशी उभे होते, पण त्यांनी असे का केले मला माहीत नाही, असे रूपाली चाकणकर यांनी म्हटले. राष्ट्रवादीच्या कोट्यात तीन जागा असत्या तर मी आमदार झाले असते, असेही त्यांनी सांगितले.



विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त ७ आमदारांच्या निवडीनंतर अजित पवार गटातील पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी आपली नाराजी व्यक्त करत शहराध्यक्ष पदाचा राजीनाम दिला. यावर रूपाली चाकणकर म्हणाल्या, मानकर यांनी असे केले माहीत नाही. राज्यपाल नियुक्त आमदारांच्या कोट्यात आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तीन जागा आल्या असत्या, तर महिला म्हणून मला आमदारकी मिळाली असती. मला तशी अपेक्षा होती आणि मी मागणी देखील केली होती. परंतु, दोनच जागा आम्हाला मिळाल्या. पुढच्या वेळेला माझा विचार केला जाईल, असे सांगत रुपाली चाकणकर यांनी आपली इच्छा व्यक्त केली. तसेच महिला आयोगाचे अध्यक्ष पद मला परत दिल्याने महायुती सरकारचे आभार मानते, असेही त्यांनी म्हटले.

राज्यपाल नियुक्त कोट्यातून आमदारकी न दिल्याने अजित पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी ६०० जणांना सोबत घेत राजीनामा दिला होता. सुनील तटकरे यांनी रुपाली चाकणकर यांच्याबद्दल तत्परता दाखवली, ती आमच्याबद्दल का दाखवली नाही, असा प्रश्न देखील दीपक मानकर यांनी उपस्थित केला. आम्हाला का संधी मिळाली नाही, रूपाली चाकणकरांनाच सातत्याने संधी का मिळते, त्या कार्यकर्तीला तुम्ही ताकद देता, २४ तास तुमच्यासोबत असतात म्हणून तुम्ही त्यांचीच बाजू घेणार का, आम्हाला का नाही विचारणार, असे म्हणत दीपक मानकर यांनी रूपाली चाकणकरांवर टीका केली होती.


## विभागीय शिक्षण मंडळावर प्रा.अनंत गोलाईत यांची निवड

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत येथील स्वामी विवेकानंद सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, संस्थाचालक प्राचार्य. अनंत बाबुराव गोलाईत यांची छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यकारी समितीच्या अशासकीय सदस्यपदी निवड करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की,

शालेय शिक्षण विभागाच्या शिफारसी नूसार शिक्षण मंडळाच्या कार्यासन अधिकारी श्रीमती मृणाली काटेंगे यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातून कार्यकारी समितीच्या रिक्त पदावर १७ अशासकीय सदस्यांची मंगळवारी दिनांक १५ ऑक्टोबर रोजी नियुक्ती केली आहे. नियुक्तीमध्ये प्राचार्य अनंत गोलाईत यांची व्यवस्थापन समितीच्या माध्यमिक



विभागात सदस्यपदी निवड करण्यात आल्यामूळे प्राचार्य आनंत गोलाईत यांचे अभिनंदन होत आहे.

## मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी करावी:ईव्हीएमवरील आरोप टाळण्यासाठी वंचितचा निवडणूक आयोगाला सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**-महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. मात्र ही मतमोजणी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाला लेखी निवेदन देखील देणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ते आज सकाळी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्र हे शांतताप्रिय राज्य असल्याचे निवडणूक आयोगाने मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी एका टप्प्यात निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाचा हा निर्णय चांगला असून सर्वच राज्यांमध्ये अशाप्रकारचा निर्णय घ्यायला हवा. मात्र निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी व्हावी, अशी आमची मागणी आहे. निवडणूक आयोगाने या मागणीवर विचार करावा. यापूर्वी बॅलेट पेपरद्वारे मतदान व्हायचे तेव्हा दुसऱ्याच दिवशी मतमोजणी केली जायची. मला वाटते की, ईव्हीएम हे मशीन आहे त्यामुळे लगेच मतमोजणी करता येते. दुसऱ्या दिवशी मतमोजणी झाल्यास हरियाणा निवडणुकीवेळी झालेले आरोप पुन्हा होणार नाहीत. याबाबत निवडणूक आयोगाला आम्ही लेखी पत्र देखील पाठवणार आहोत, असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.क्रिमीलेयर जीआरवर बोलताना आंबेडकर म्हणाले, सुप्रीम कोर्टाने वर्गीकरण आणि क्रिमीलेयर बाबत जो निर्णय घेतला होता, तो काय होता? त्यावर पॉलिसी बनू शकते की, संसद यावर केवळ निर्णय घेऊ शकते. तर यावर फक्त संसदच निर्णय घेईल आणि हा मुद्दा कोर्टात आहे. मात्र त्याआधीच या राज्य सरकारनेच त्याची अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि जीआरही जारी केला, हे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.प्रकाश आंबेडकर आंबेडकर म्हणाले, ओबीसी समाज भाजपला मतदान करेल, असे मला वाटत नाही. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावेळीही आमच्या पक्षाने भूमिका जाहीर केली होती. आम्ही ओबीसींच्या समर्थनासाठी पुढे आलो होतो आणि आरक्षण बचावासाठी उभे राहिले होतो. त्यामुळे भाजपने कितीही प्रयत्न केला तरी ओबीसी समाज त्यांना मतदान करणार नाही, असा विश्वास प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला.

# मराठवाडा शिक्षक संघ व बामुक्टो यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी उमरगा येथे 'शिक्षण बचाव'परिषद

**जालन । प्रतिनिधी**

सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मोडीत काढून बहुजन समाजास शिक्षणाची दारे बंद करणारी धोरणे आखली व राबवली जात आहेत. याबाबत जनजागृती करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघ व बामुक्टो यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी उमरगा येथे 'शिक्षण बचाव' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे परिषदेचे उद्घाटन करणार असून शिक्षक-प्राध्यापक चळवळीतील दिग्गज परिषदेस उपस्थित राहणार आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, मराठवाड्यातील शिक्षक आणि प्राध्यापकांच्या प्रमुख संघटना मराठवाडा शिक्षक संघ व बामुक्टो या संघटनांनी सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवरील संकटा बाबत जनजागृतीचे या परिषदेद्वारे रणशिंग फुंकले आहे. रविवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी शांताई मंगल कार्यालय, उमरगा जि. धाराशिव येथे सकाळी ११.०० वा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांचे अध्यक्षतेखाली ही परिषद होत असून विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे या परिषदेचे उद्घाटन करणार आहेत. खा. ओमराजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. पी. लवांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून प्रा. डॉ. बप्पासाहेब मस्के-अध्यक्ष बामुक्टो, राजकुमार कदम- सरचिटणीस मराठवाडा शिक्षक संघ, प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे -सरचिटणीस बामुक्टो आणि श्री संतोष कांबळे- एआयसीसी नॅशनल कोऑर्डीनेटर प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहेत. महाराष्ट्रात वाड्या वस्त्यांवर राहत असलेल्या बहुजन समाजा पर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फुले-शाहू-आंबेडकर या महामानवांनी केले. त्यांचा तो वारसा कर्मवीर भाऊराव पाटील, प्रा. डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बापूजी साळुंखे, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, समाजसुधारक बलभीमराव कदम यांसारख्या शेकडो शिक्षण महर्षींनी पुढे नेला, म्हणून महाराष्ट्र देशात पुरोगामी राज्य म्हणून पुढे आले. परंतु विद्यमान राज्यकर्त्यांची शैक्षणिक धोरणे अगदी या महापुरुष व शिक्षण महर्षींच्या धोरणांच्या विरोधात आहेत. सार्वजनिक शिक्षण क्षेत्रातून सरकार अंग काढून घेत आहे. जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित शाळा, महाविद्यालयात शिकवण्यासाठी शिक्षक, प्राध्यापक नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा व अनुदानित शाळेतील तुकड्या बंद पडताहेत तर महाविद्यालये ओस पडली आहेत. राज्यात विनाअनुदानित खाजगी शाळा महाविद्यालयांचे पेव फुटले आहे. शासनाच्या शिक्षण विरोधी धोरणामुळे सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मरणासन्न अवस्थेत येवून पोहंचली आहे. ही व्यवस्था उद्ध्वस्त झाली तर बहुजन समाजाला शिक्षणाची दारे बंद होणार आहेत. या संदर्भात समाजातील एक जागरूक घटक म्हणून जनजागृती करण्याच्या उद्देशाने मराठवाडा शिक्षक संघ व बामुक्टो या संघटनांनी ही शिक्षण बचाव परिषद आयोजित केली असल्याचे परिषदेचे संयोजक बामुक्टोचे धाराशिव जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. संजय कांबळे तुगांवकर, मराठवाडा शिक्षक संघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने व केंद्र कार्यकारिणी सदस्य फारूक जमादार यांनी सागितले.सदर शिक्षण बचाव परिषदेस जालना जिल्ह्यातील बहुसंख्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077